साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

# तिफण

वर्ष १३ वे, अंक - दुसरा    जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर २०२२

UGC Care Listed Journal
ISSN 2231 - 573X

• संपादक •
डॉ. शिवाजी हुसे

पत्ता : संपादक, तिफण, 'शिवार', श्रीराम कॉलनी, हिवरखेडा रोड,
कन्नड, जि. औरंगाबाद – ४३११०३, मो. ९९०४००३९९८


CamScanner

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | लेखाचे शीर्षक / लेखकाचे नाव | पृ. क्र. |
|---|---|---|
| १. | मराठी बोलींच्या अभ्यासाचे महत्त्व<br>- डॉ. गणपत ढेंबरे | १ - ७ |
| २. | बृहन्महाराष्ट्र : मराठी भाषा आणि अध्ययन, अध्यापनाचे स्वरूप<br>- डॉ. संजयकुमार करंदीकर | ८ - १३ |
| ३. | मराठी लिपी सुधारणा : काही उपाय<br>- डॉ. सुधाकर शेलार | १४ - २० |
| ४. | आगरी बोली उद्‌गम व विकास<br>- डॉ. अनिल बळीराम बांगर | २१ - २७ |
| ५. | मॉरिशसमध्ये मराठी भाषेचे एक ओझरते दृष्टिक्षेप<br>- डॉ. बीदन आबा | २८ - ३० |
| ६. | कृषिसंस्कृती, बोलीभाषांचे जतन व व्यवस्थापनाचे आवाहन<br>- डॉ. दत्तात्रय प्रभाकर डुंबरे | ३१ - ३४ |
| ७. | आदिवासी बोलींचे ऐतिहासिक, भाषिक व वाङ्मयीन महत्त्व<br>- डॉ. कैलास सोनू महाले | ३५ - ३७ |
| ८. | सातारी बोलीतील लोकधन - हुमणे (कोडी)<br>- डॉ. जया कदम | ३८ - ४२ |
| ९. | वारकरी संतविषयक कादंबरीची भाषाशैली<br>- राजेंद्र थोरात | ४३ - ४६ |
| १०. | यशवंतराव चव्हाण यांचे साहित्य आणि मराठी भाषा व संस्कृतीविषयक धोरणे - डॉ. नानासाहेब धों. पवार | ४७ - ५३ |
| ११. | अहिराणी बोली स्वरूप व वैशिष्ट्ये<br>- डॉ. प्रकाश शेवाळे | ५४ - ५७ |
| १२. | मराठवाड्यातील गोदाकाठच्या परिसरातील बोलीभाषा<br>- डॉ. शंकर मुंडे | ५८ - ६१ |
| १३. | बोलीभाषा अभ्यासाचे महत्त्व<br>- डॉ. मंजुषा दिगंबर समर्थ | ६२ - ६४ |
| १४. | संत तुकारामांच्या कवितेतून येणारी बोलीभाषा<br>- बालासाहेब विष्णु कटारे | ६५ - ६८ |




CamScanner



# आगरी बोली उद्‌गम व विकास

- डॉ. अनिल बळीराम बांगर
मराठी विभागप्रमुख
को.ए.सो.लक्ष्मी-शालिनी महिला महाविद्यलय-पेझारी
ता. अलिबाग, जि. रायगड.
मो. ९०२८०९२१११

भाषा ही मानवी समूहाने परस्पर विचार विनिमयासाठी संपर्कासाठी अभिव्यक्तीसाठी हेतुपूर्वक केलेली प्रक्रिया असते. ध्वनीयुक्त संकेत त्यांचे साधन असते. उच्चार व श्रवण हे माध्यम असते. समाजातील व्यक्तीचे व्यवहार भाषेच्या साहाय्याने चाललेले असतात . म्हणून भाषा त्या त्या समाजाची जरी भिन्नभिन्न असली तरी ती एक व्यवहाराचे साधन असते. समाजामध्ये बदल होत असतात. राजवटी सत्ता बदलत असतात. राज्यकर्ते नेहमी आपली भाषा पराभूतावर लादत असतात. भारतीय भाषांच्या व बोलीच्याबाबतीत असेच घडले आहे. शिलाहार, सातवाहन, मौर्य, मुस्लिम, पोर्तुगीज, इंग्रज असे अनेक सत्ताधीश झाले. त्याच बरोबर त्यांनी त्यांची संस्कृती व भाषाही लादली. त्यामुळे समाजात बदल झाले. परिवर्तन होत राहिले. भाषा परिवर्तनशील नसते. त्या भाषेला त्या समुदायाची अथवा समाजाची अभिव्यक्ती करता येणार नाही. ज्याप्रमाणे समाजाची जडणघडण गरजा बदलत जातात. भाषेची परिवर्तनशीलता हे जिवंतपणाचे लक्षण आहे. ना. गो. कालेलकर यांनी म्हटले आहे की, "बोली हे दैनंदिन व्यवहाराचे स्वाभाविक साधन आहे. परिस्थितीला अनुरूप अशा भाषिक सामुग्रीचा उपयोग ती करते. मौखिक परंपरेने आल्यामुळे तिच्या अंगी एक प्रकारचा जिवंतपणा असतो. ती साधी पण परिणामकारक असते. आपले रूप प्रतिष्ठेच्या आरशात पाहून इतरांना ते आकर्षक वाटेल असे करण्याचा प्रयत्न करायला तिला वेळ नसतो. तिची स्वाभाविकता हेच तिचे वैशिष्ट्य असते. भाषा ही आंतरक्रियेचे समाज व्यवहाराचे, विचारांच्या आदान-प्रदानांचे, सांस्कृतिक परंपरा जोपासण्याचे, व्यक्ती विकासाचे महत्त्वाचे साधन आहे. भाषा ही विविध रूपिनी असते ती अनेक रूपे धारण करते तिचे वैशिष्ट्य. 'दर बारा कोसावर भाषा बदलते' या लोकोक्तीतून प्रकट होते. भाषा ही संज्ञा फार व्यापक अर्थाने आपण वापरतो. आपला आशय अक्षरबद्ध स्वरूपात म्हणजेच लिहून आपण प्रकट करतो. त्याच प्रमाणे दैनंदिन व्यवहारात बोलून प्रकट करतो. दोहोंनाही आपण भाषा असेच म्हणतो. अक्षरबद्ध रूपातील म्हणजेच लिखित रूपातील साधन हे कृत्रिम असते. ते जसे बोलले जाते तसेच नसते. ते हेतुपूर्वक बदललेले असते. व्यवहारात आपण जे बोलतो त्यातील भाषेचे रूप बरेच स्वाभाविक असते. त्यामुळे पहिल्या स्वरूपातील भाषेला 'लेखभाषा' आणि दुसऱ्या स्वरूपातील भाषेला 'बोल-भाषा' असे म्हटले जाते. यावरून स्पष्ट होते की, लेख-भाषा व बोल-भाषा यांच्या रूपात फरक असतो. लेख-भाषेतील स्वरूप कसे असावे यासंबंधी विचार केला जातो; मात्र बोल-भाषेतील रूप कसे असावे असे कुणीही सांगू शकत नाही.

**बोलीची संकल्पना :**

बोली ही बोलण्याची भाषा. बोलीला आपली एक विशिष्ट ढब असते. माणूस ज्या वातावरणात राहतो. तेथील भाषा ही त्यांच्या अंगवळणी पडत असते. बोली हे भाषेचे आद्यरूप असते. ती नादमधुर आणि भावपूर्ण संक्रमक असते. या अर्थाने ती फार महत्त्वाची असते.

शिवाय सर्वसामान्य समाज, बहुजन समाज तिचा दैनंदिन व्यवहारात वापर करीत असल्यामुळे ती जिवंत व लवचिक असते. आम्ही बोलत असतो, सारखे बोलत असतो, त्या बोलण्याच्या भाषेला 'बोली' म्हणतो. विशिष्ट प्रदेशातील विशिष्ट लोक वेगवेगळे बोली बोलतात, पण माणूस म्हटले की बोली आलीच. भाषा विज्ञानात भाषेचे औपचारिक आणि अनौपचारिक असे ठळक भेद पाडलेले आहेत. बोलीभाषा ही अनौपचारिक असते. इवान इलिचने औपचारिक भाषेला डब्याच्या दुधाची आणि अनौपचारिक भाषेला 'आईच्या' दुधाची उपमा दिली आहे.

**मराठीच्या बोलीभाषा**

आगरी बोलीही विशिष्ट भूप्रदेशात राहणाऱ्या लोक जीवनाच्या व्यवहार भाषेतून प्रकट होताना दिसते. आगरी बोलीभाषेतून प्रेम, वात्सल्य, जिव्हाळा, करुणा, दया असे विविध रस आविष्कार सौंदर्याविष्कार व्यक्त होताना दिसतात. आगरी बोली ही आगर व समुद्र किनारपट्टीतील लोक समुदायाची हृदयाची भाषा आहे. या आगरी बोलीच्या विकासात मराठीबरोबरच अन्य भाषांचाही हातभार लागलेला दिसून येतो. 'बारा कोसावर भाषा बदलते' असे म्हटले जाते ते अक्षरश: खरे आहे. बोलीभाषा तर या बाबतीत आणखी पुढे आहे तिचे रूप तर अगदी कोसा-कोसांवर वेगवेगळे आढळते आणि अगदी बारकाईने विचार केला तर एकाच गावात अठरापगड जाती राहत असतील तर जातीगणिक बोली निरनिराळी रूपे धारण करते. कोकणात विशेषता उत्तर कोकणातील समुद्र किनाऱ्यावरील गावात भाषा वैशिष्ट्य थक्क करून सोडणार आहे. भाषेची अनंत रूपे आहेत. मराठी भाषा घेतली तरी तिच्या स्थलपरत्वे, कालपरत्वे पोटभाषा आहेत. वऱ्हाडी, नागपुरी, सातारी, खानदेशी, कोकणी या साऱ्या प्रादेशिक भाषा म्हणजे मराठी भाषेच्या बोली आहेत. मराठीच्या महाकाय वटवृक्षाला या बोली फांद्या आहेत. या फांद्यांना आणखी इतर फांद्या डहाळ्या आणि पारंब्यादेखाल आहेत. या फांद्यांनी माय मराठीला भरभक्कम आधार दिला आहे. आगरी बोली ही मराठीच्या अजस्त्र महावृक्षाची एक पारंबीच म्हणावी लागेल. गोवा, कारवारपासून थेट दमण प्रांतापर्यंत पसरलेल्या प्रदेशातील कोकणी या प्रादेशिक भाषेची एक बोली आगरी, उत्तर कोकणी, कोकणी या प्रादेशिक भाषेची आणि अंतर्मन मराठीशी अतूट असे नाते सांगणारी आहे. आगरी बोली मराठीची लेक असली तरी तिचा तोंडवळा माय मराठीपेक्षा काहीसा वेगळा आहे, हेदेखील तितकेच खरे आहे. मायलेकीमध्ये जसे साम्य असते आणि भेदही असतो. तोच प्रकार मराठी आणि आगरी बोली भाषेच्या बाबतीत आहे. कोणत्याही बोलीचे हे व्यवच्छेदक लक्षण असते. आगरी बोली त्याला अपवाद कशी असणार? आगरी लोकांची मायबोली ती आगरी बोली आजही फार कमी प्रमाणात बोलली जाते. जुनी पिढी आणि आगरी वस्तीची गावच सोडली तर आगरी बोलीचा प्रयोग फार कमी होऊ लागला आहे. शिकले-सवरलेले आणि शहरात राहणारी आगरी प्रमाण मराठीत भाषा बोलताना दिसतात. दोन आगरी भेटले तरी 'काय र कवा आलास' ऐवजी 'काय रे कधी आलास' असंच नागरी मराठीत म्हणणार; दर्यावरचा कोळी आगरातला आगरी, माळातला माळी आणि रानातला आदिवासी अशा भौगोलिकदृष्ट्या कोकणातल्या आगरातील वसाहती. 'आगर म्हणजे भात, मीठ, नारळ, सुपारी, भाजीपाला, फळे व मासे संवर्धन करण्याची जागा असेच आगर पिकविणारा तो आगरी' आगरी जातीचे वास्तव्य प्रामुख्याने रायगड, ठाणे, मुंबई, नवी मुंबई, पालघर येथे आढळते. आगरी गावाच्या आसपास मराठी लोकांची स्वस्त असल्याने इतर भाषांतील शब्द किंवा त्या भाषातील बोलण्याची ढब लकब यांची सरमिसळ आगरी बोलीवर झालेली दिसत नाही. मराठीने स्वीकारलेले इंग्रजी व अन्य भाषांतील शब्द मात्र आगरी बोलीत येतात. कोळी, आगरी या भाषांमध्ये विलक्षण साम्य आहे. विशेषता पालघर जिल्हा वगळता हे साम्य लक्षणीय आहे. शब्द, वाक्यरचना, क्रियापद इतकेच नव्हे तर बोलण्याची ढब ही दोन्ही बोलीमध्ये सारखीच



CamScanner

आहे. 'तू कवार चाललास अथवा 'गोमू अवारये' ही कोळी बोलीतील वाक्य आगरी बोलीतही येतात. 'वासू दरयाचे किनारी गेलाय' ही वाक्ये आगरी कोळी या दोन्ही बोलीत उच्चारली जातात. आगरी बोली आजवर मौखिक बोली म्हणून ओळखली जात होती. पण अलीकडे या बोलीत विपूल प्रमाणात लेखन होऊ लागले आहे. आधुनिक पिढी आग्रहपूर्वक ही बोली जतन करण्याचा प्रयत्न करते आहे. नवी अनुभूती नवी वेदना संवेदना नव्या जाणिवा अनुभव त्यातून व्यक्त होत आहेत. बोलीभाषा या प्रादेशिकतेनुसार व जातीनुसार बदलत असतात. त्यामुळे एकच भाषा बोलणाऱ्या व्यापक प्रदेशात स्थानभेदानुसार संस्कृतीनुसार, व्यवसायानुसार जातिभेदानुसार निरनिराळ्या बोली अस्तित्वात येतात. व्यक्ती ज्या भौगोलिक प्रदेशात राहते व समाजाच्या सामाजिक पातळीवर दैनंदिन व्यवहार करते त्या समाजाच्या लोक व्यवहारातील बोलीला बोलीभाषा असे म्हटले जाते. अलीकडे झालेल्या एका पाहणीत जगात सुमारे सात हजार इतक्या भाषा असल्याचे सर्वेक्षणात आढळून आले आहे यातील अनेक भाषांची त्यांच्या नावा पलीकडे अधिक कोणतीही माहिती मिळू शकली नाही. केवळ भारतातच सुमारे दोनशे भाषा बोलल्या जातात. त्याच्या बोलीची संख्या पंधराशेहून अधिक आहे. एकट्या मराठी भाषेच्या ३९ बोलींचा ग्रियर्सनने उल्लेख केलेला आहे.

**मराठीच्या बोलीभाषा :**

भाषा खरे पाहता मौखिक ध्वनीची बनलेली असते; परंतु ती लेखनबद्ध झाली की नियमानी जखडली जाते. तिच्यात समाजाच्या सर्वांगीण प्रगतीबरोबर वाङ्मयनिर्मिती होऊन ती वरिष्ठांशी प्रतिष्ठेची भाषा बनते. याच भाषेला मग प्रमाण भाषेचे महत्त्व येते. वास्तविक प्रमाणभाषा याआधी बोली भाषाच असतात. जेव्हा संस्कृतही ज्ञानाची प्रमाणभाषा होती. तेव्हा आजची मराठी ही प्राकृत रूपात म्हणजे बोली स्वरूपात होती. सर्वसामान्य माणसाला जेव्हा संस्कृत भाषा येत नव्हती. तेव्हा ते व्यवहारात प्राकृत मराठीत बोलत असत. म्हणूनच पहिले क्रांतिकारक कवी संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी संस्कृतमध्ये न लिहिता समाजाच्या बोलीभाषेत प्राकृत मराठीत लिहिली. समाजाच्या बोलीभाषेत लिहिण्याचा पहिला मान हा ज्ञानेश्वरांना दिला जातो. संत एकनाथ आणि त्यांचा मुलगा यांच्यात प्राकृत व संस्कृतमुळे वाद होत असे! ते संस्कृतचे गाढे पंडित होते; परंतु संत एकनाथ मात्र आपले लेखन सामान्य माणसाच्या बोलीत प्राकृतमध्ये करीत असत. त्यांनी एकनाथी भागवतात म्हटले आहे. 'संस्कृत वाणी देवे केली, प्राकृत तरी काय चोरापासून झाली?' (एकनाथी भागवत, अध्याय १, ओवी क्रमांक २९) आगरी बोली ही प्राकृत समूहातील बोली आहे. यादव काळात हरलेल्या शिलाहारांनी यादवकालीन संस्कृती स्वीकारली. त्यामुळे आगरी बोली प्राकृत आणि यादवकालीन भाषेस खूप जवळची आहे. पराभूत आपले राज्य गमावतात तशी ते आपली संस्कृतीही गमावतात. ब्रिटिश राजवटीचा परिणाम येथील भाषा, संस्कृतीवर अशाच प्रकारचा झालेला दिसतो. अनेक इंग्रजी शब्द आगरी बोलीतही आलेले दिसून येतात. उदा. डर्टी, टी-शर्ट, बुक्का, सिक, ऑफ, शायनिंग, हॅपी बर्थडे, थँक्यू, सॉरी इत्यादी शब्द इंग्रजाकडून आगरीने स्वीकारले. यामुळे सांस्कृतिक बदल आणि भाषिक बदल मोठ्या प्रमाणात झालेला दिसतो.

मराठी भाषेच्या उत्पत्तीबाबत इतिहासाचार्य वि. का. राजवाडे म्हणतात, "महाराष्ट्रीय लोक ज्याकाळी दक्षिणेस आले तेव्हा त्यांना त्यांचा तेथील नाग लोकांशी संपर्क आला. ते जुनी वैदिक भाषा तिचा अपभ्रंश नागलोक बोली म्हणून वापरीत. या दोन संस्कृतीचा मिलाफ होऊन नवीन संस्कृती व भाषा निर्माण झाली. आगरी क्षत्रिय, मराठे, कुणबी या जाती नागवंशीय आहेत. हे सांगून राजवाडे आणखी पुढे म्हणतात, नाग लोकांना जोडाक्षरे उच्चारण्याचा कंटाळा असतो. तसेच अंत्य 'अ' उच्चारण्याचा कंटाळा असे, तसेच संयोगापूर्वी स्वर दीर्घ उच्चारण्याची खोड असे. महाराष्ट्रीकांचा व नागांचा जेव्हा मिलाफ झाला. तेव्हा



CamScanner

नागांच्या ह्या तिन्ही खोडी महाराष्ट्रीकांवर लादल्या गेल्या" आगरी बोलीभाषेत या तीन लकबी दिसून येतात.

**आगरी बोलीचे प्रभावक्षेत्र :**

सह्याद्रीपासून अरबी समुद्रापर्यंतचा पश्चिमेकडील प्रदेश म्हणजे पूर्वीचा 'अपरान्त' होय. कोकण हे त्याचे प्राकृत नाव. ठाणे, मुंबई, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग हे जिल्हे व गोवा हा पूर्वीचा प्रदेश कोकणामध्ये ही तसे आज ठाणे, पालघर, मुंबई, नवी मुंबई, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग हे जिल्हे हा कोकणचा भाग मानला जातो. कोकणची पूर्वीची मानवी वसाहत भौगोलिकदृष्ट्या पाहिली तर दर्यावर दर्यावर्दी म्हणजे कोळी त्यानंतर पूर्वेकडे गेल्यावर आगरातला आगरी, माळावरचा माळी आणि वनातला म्हणजे आदिवासी या दरम्यान होती. हे सर्व मानवी समूह अनार्य म्हणजे द्रविड संस्कृतीमधील आहेत. यातील दर्यावरचा कोळी आणि माळावरचा माळी या दोन्हींच्या मधील आगर (नारळी, पोफळी, भाजीपाला, भात, मीठ, वगैरे पिकविण्याचे ठिकाण) पिकविणारा तो आगरी समाज होय. या आगरी समाजाची मूळ वस्ती ठाणे, पालघर, मुंबईपासून, अलिबाग, पेण, मुरुड, म्हसळा, श्रीवर्धनपर्यंत दिसून येते. आगरी समाज हा मूलतः कुणबी म्हणजे शेतीप्रधान आहे. त्याच्या कष्टावर बलुतेदार व इतर समाज जगत होते. हे सारे समाज सागरातील समाज आगरी लोकांबरोबरच त्यांची आगरी बोली बोलत होते, म्हणून त्या बोलीला आगरी बोली जातीवाचक म्हणतात. आगर बोली किंवा आगरातील बोली म्हणणे संयुक्तिक ठरेल. मराठी भाषा ही संस्कृत, प्राकृत आणि नंतर मराठी अशी बदलत बदलत अस्तित्वात आलेली आहे. यादवकालीन मराठी ही प्राकृत होती. भागवत संप्रदाय, महानुभाव संप्रदाय यातील ग्रंथनिर्मिती ही यादव काळातच झाली. ती साधारण बाराव्या, तेराव्या शतकात झाली. आगर बोली ही प्राकृत बोली ती एक बोली आहे. तिच्यात यादवकालीन बोलीतील 'ज्ञानेश्वरी', 'विवेकसिंधु', 'लीळाचरित्र' वगैरे ग्रंथातील शब्दांबरोबरच संस्कृतमधील शब्दांची अनेक अपभ्रंश रूपे दिसून येतात. आगर बोली निश्चित कोणत्या काळात बोलली जात होती ते सांगता येत नाही. मात्र ही बोली प्राकृतकालीन मराठी आहे, एवढेच येथे नोंदवता येईल. १९६० नंतर मराठी साहित्यात लिखित स्वरूपात शंकर सखाराम व परेन जांभळे यांच्या लेखनातून मराठी सारस्वतात ही बोली भाषा आली रूळली आणि ओळखीची झाली. प्रसिद्ध लेखक परेन जांभळे म्हणतात "कोणतीही बोली म्हणजे स्वयंप्रज्ञ – स्वयंभू प्रकाशच असतो. अव्यक्त अमूर्त भावनांचे व्यक्त गोचर रूप हे बोलीतूनच जाणवते, दृश्यमान होते. बोली ही जन्मजात पारंपरिक ऊर्जस्वल लोकसंस्कृतीच असते. अक्षर साहित्यरत्नांच्या अक्षय खाणी म्हणजेच बोलीभाषा होत. कोणत्याही जनसमूहाची बोली ही अल्पाक्षरत्व आणि अर्थबहुल या विशेषणांनी ओथंबलेली असते. कोकणात वाडवली, मालवणी, चित्पावनी, कोकणी, कोळी, मांगेली, इत्यादीच्या जोडीला आगरी बोलीसुद्धा नवनवोन्मेष शालिनी प्रतिभेचे अक्षरलेणे आहे. पण अशा सुलक्षणी आगरी बोलीला तथाकथित पुढारलेल्या समाजाने असंस्कृत व अडाणी ठरविली, त्यामुळे तिची घोर उपेक्षा तर झाली त्याचबरोबर कालप्रवाहाच्या रेट्यात कितीतरी शब्दसंपत्ती विलयाला गेली." पालघर, ठाणे, मुंबई पासून, अलिबाग, पेण, मुरुड, म्हसळा, श्रीवर्धनपर्यंत बहुसंख्येने महाराष्ट्राच्या पश्चिम किनारपट्टीवर आगरी समाज पसरलेला आहे. बोली आगरी असली तरी त्यात विविधता आहे. आगरी या शब्दाचा अर्थ नारळ सुपारी यांच्या बागा, शेतीवाडी, भाजीपाल्याचा मळा, संग्रहस्थान तसेच मिठाचे क्षेत्र इत्यादी अर्थाने आहे. आगरी समाज नागरी वस्तीपासून दूर खाड्यांच्या किनारी वसला आहे. शिक्षणापासून अथवा बाह्य संस्कारांपासून तो दूर होता. त्यामुळे अनेक शतके अनेक पिढ्या त्यांनी आपली अपभ्रंश महाराष्ट्र बोली म्हणजे प्राकृत आगरी बोली म्हणून जतन केली. पुढे यादवकालीन मराठीचेही संस्कार तिच्यावर झाले, त्यामुळे मराठी भाषेचे बोली स्वरूपातील रूप म्हणून

आगरी बोलीत अनेक साम्यस्थळे आढळून येतात.

भाषाही जनसमूहाच्या संस्कृतीचा भाग असल्याने ती संस्कृतीच्या प्रकटीकरणाचे एक महत्त्वाचे साधन होय. ती भाषाच त्या समूहाच्या वर्तणुकीच्या आकृतिबंधाचे स्वरूप स्पष्ट करते. खाण्यापिण्याच्या सवयीपासून ते अध्यात्मिक ज्ञान साधनेपर्यंत सर्व गोष्टी भाषेच्या माध्यमातून साध्य होतात. त्या त्या समाजमनाचे वास्तव स्वरूप जाणून घ्यायचे असेल, तर त्या बोलीचा सखोल अभ्यास करणे आवश्यक ठरते. आगरी समाज समुद्रकिनारी स्थिरावला. जसजशी वर्षे पाठीमागे जाऊ लागली तसतसे आगरी समाज बांधवांचे राहणीमान व बोलण्यात फरक पडत गेला. भौगोलिक परिस्थितीनुरूप त्यांच्या बोलीवर परिणाम झाला. आगरी माणसाचा व्यवसाय शेती, मासेमारी, रेती काढणे व मीठ पिकविणे. त्यामुळे व्यवसायानुरूप शब्दांचा वापर होत राहिला. काही जुने मराठी शब्द वापरात ठेवून तर काही शब्दावर संस्कार करून नवीन शब्द निर्माण करून आगरी बोली निर्माण झाली असावी. आगरी बोली ही ही एक समृद्ध बोली आहे. तिच्यात स्वतःचे असे स्वतंत्र अनेक शब्द आहेत.

**बोलीचे व्याकरण :-**

भाषा ही प्रवाही आहे. जी भाषा आजवर बोलली जाते म्हणजे ती जिवंत बोलीभाषा होय. तिच्यात कालपरत्वे व प्रांतपरत्वे बदल होत राहणार. "भाषा बदलत चालली म्हणजे तिच्या लेखन पद्धतीतही बदल होणे साहजिक आहे. आधी भाषा बनते मग तिचे व्याकरण ठरते. भाषेत बदल होत गेला की व्याकरण कार्याला शरणागती पत्करावी लागते. पूर्वीच्या नियमांना मुरड घालावी लागते. परिणामतः लेखन विषय ठरलेल्या नियमातही बदल करावा लागतो. अक्षरे म्हणजे आवाजाच्या खुणा असतात. अक्षरांच्या खुणांनी कागदावर लिहून दाखवतो यालाच लिपी असे म्हणतात. बोलीभाषांना स्वतंत्र लिपी नसते. तशी आगरी बोलीलाही स्वतंत्र लिपी नाही. आगरी बोलीत नामाची रूपे विभक्तीचे प्रत्यय वेगळे आहेत. मूळ प्रमाण भाषेनुसार ते चालत असले तरी उच्चारात वेगळेपण आहे. आगरी बोलीत मुर्धन्य ध्वनीचा वापर फारसा केला जात नाही. ठ, ड, ण, ळ, हे ध्वनी फार वापरले जात नाहीत. 'श' ऐवजी 'स' वापरतात. सोपे उच्चार करून भाषा सहज सुलभ करण्याकडे लोकांचा कल असतो. प्रमाण मराठीच्या स्वर व्यवस्थेशी तुलना करता 'ओ' हे स्वर त्र, ष, छ, ण, ळ ही व्यंजने बोलीमध्ये आढळत नाहीत.

**उच्चारप्रक्रिया :**

१. आगरी बोलीचे उच्चार मृदु, कंठ्य व दन्त्य उच्चार आगरी बोलीत टाळण्याचा प्रयास केला जातो. उदा. रात्र - रात, बाण - बान इत्यादी
२. दन्त्य उच्चार टाळले जातात. उदा. प्रत्येक - परतेक.
३. ऊन-हून प्रत्यय ऐवजी 'शी' प्रत्यय लावला जातो. उदा. मी घरातून धावत आलो. - मी घरन्शी धावत आलू.
४. आगरी बोलीत 'व' चा लोप होऊन पुढे महाप्राण येतो. उदा. जेवढा - जव्हरा.
५. आगरी बोलीत काही ठिकाणी 'व' चा लोप 'ई'कार होतो. उदा. विकास - इकास, विष - ईख इ.
६. शब्दांचे अंत्य अक्षर 'ओ' असेल तर 'ऊ'कार होतो. उदा. पोहोचलो - पोहोचलू.
७. आगरी शब्दात 'ढ' अक्षराचा लोप होऊन त्याचे 'ह' मध्ये रूपांतर होते. उदा. तिढा - तिन्हाइ.
८. आगरी बोलीत 'ळ' ऐवजी 'ल' वापरला जातो. उदा. निळा - निला, सगळा - सगला इत्यादी.
९. प्रमाण मराठी भाषेतील आकारातमरूप अकारान्त होते. उदा. आल्याचा काढा - आलंचा कान्हा.
१०. आगरी बोलीत 'र' अक्षर आले तर त्याचे 'ल' मध्ये रूपांतर होते. उदा. राखाडी - लाखारी गा

अशाप्रकारे अजूनही वेगवेगळ्या पद्धतीने शब्दांचे उच्चार आगरी बोलीत आढळतात. आई हा शब्द पेण भागात 'आईस' अलिबाग भागात 'आयवं'

तसेच ठाणे व उरण भागात 'आसं' असे उच्चारतात.

११. बोलू हा शब्द जुन्या लोकांच्या आगरी कोळी बोलीभाषेत पुन: पुन्हा येतो. उदा. 'असा बोलू करावा नाय', त्या बोलू जमाचा नाय इ.

१२. आगरी बोलीचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे 'ळ' च्या ऐवजी 'ल' व 'न' च्या ऐवजीं 'न' जसे – पळव - पलव, बाळा - बाला, कोन - कोण इ.

१३. यादवकालीन भाषेचे आजही आगरी बोलीमध्ये वापरले जाणारे काही शब्द: करा (घट किंवा मातीचा घडा), नई (नदी), सीत (शिजवलेल्या भाताचा दाणा), सीसा (बुधली, बाटली), खांडूक (खांडकी, तुकडी), गोद्री (गोधडी), पालव (लुगड्याचा पदर), दूनव (दुसऱ्यांदा नांगरणी करणे), तीख (तिखट), निसण (शिडी), अशी अनेक उदाहरणे आहेत.

१४. आगरी बोलीत सामान्य रूपाचा वापर करून बोलण्याचा प्रघात दिसून येतो. बाप - बापूस, आई - आईस, लोक - लोकूस, आजोबा - आजुस, आजी - आजीस.

१५. आगरी बोलीची रूपे व काही शब्द महानुभाव पंथीय व भागवतधर्मीय ग्रंथ लेखनात दिसून येतात. विशेषत: 'लीळाचरित्र', 'दृष्टांत पाठ', 'ज्ञानेश्वरी'त जास्त प्रमाणात दिसतात. संत ज्ञानेश्वरांनी सांडणे हा शब्द कितीतरी ओव्यांमध्ये वापरला आहे. हरवणे सोडून देणे, निष्काळजीपणामुळे, नकळतपणे कुठेतरी पडणे याअर्थी हा आगरी शब्द आहे.

उदा. 'म्हनऊनी स्वधर्म जो सांडील ।
तयाने काळू दंडील ॥' (३– ११२)

१६. म्हसळा – मुरूड तालुक्यात 'बांदोडी' हा शब्द जुन्या आगरी स्त्रियांच्या तोंडी आहे. 'बंधन' या अर्थी तो वापरला जातो. 'या देहाचिया बांदोडी न पाहिजे' (९–४०६) असे उपयोजन 'ज्ञानेश्वरी'त करण्यात आले आहे. आगरी बोलीत तेराव्या शतकातील प्राकृत बोलीतील शेपू, कानू, नाक अशी रूपे आगरी लोकगीतात ही आढळतात.

१७. आगरी बोली शब्दात येणारा ओकार ऊकार होतो. गेलो - गलु, आलो - आलु इ.

१८. ओकारान्त शब्द आकारान्त होऊन पुढे 'स' येतो - घेतो - घेतस, मारतो - मारतस, करतो - करतस, जातो - जातस इत्यादी.

**समारोप :**

आगरी बोली भाषा ही भारदस्त आणि कणखरही आहे. आगरी माणसाचा कणखर आणि राकटपणा त्यांच्या बोली भाषेतून जाणवतो. तर आगरी मंडळीची देहबोलीही त्यांच्या बोली भाषेशी साधर्म्य साधणारी आहे. कोणत्याही जनसमुदायाची बोली हे अल्पाक्षरी तत्त्व आणि अर्थ बोलत व या विशेषणाने ओथंबलेली असते. अहिराणी, वाडवळी, मालवणी, कोकणी, सारस्वती इत्यादींच्या जोडीला तोडीस तोड आगरी बोलीसुद्धा नवनवोन्मेषशालिनी प्रतिभेचेच अक्षरलेणे होय.

आगरी बोली ऐकण्यास कर्णमधुर आहे. भावतरंग लाघवी अशी आहे. आगरी बोली ही एकजिनसी दिसणारी बोली आहे. या बोलीत समाजाचे स्वभावगुण सहज दिसून येतात. अशावेळी समाजाला एकत्र ठेवण्यास ती फारच उपयुक्त ठरणारी आहे. तरी समाजाला एकत्रित ठेवण्यासाठी समाजाचे चांगले संस्कार इतर समाजाला देण्यासाठी आणि समाजातील काही कालबाह्य आणि असंगत प्रकारावर प्रहार करण्यासाठी आगरी बोलीतील लेखकांनी अधिकाधिक आगरी बोलीभाषेत साहित्य लेखन करून याबाबत चळवळ उभारायला हवी. अशीही उत्तर कोकणची आगरी बोली मराठी सारस्वतात पूर्वी लेखनात न आल्याने फारशी रुळलेली नाही. पण तशी ही समजण्यास कठीण मात्र नाही. आगरी बोली आजवर मौखिक बोली म्हणून ओळखली जात होती. पण अलीकडे या बोलीत विपुल प्रमाणात लेखन होऊ लागले आहे. आधुनिक पिढी आग्रहपूर्वक ही बोली



CamScanner

जतन करण्याचा प्रयत्न करते आहे. नवी अनुभूती, नवी वेदना, संवेदना, नव्या जाणिवा, अनुभव त्यातून व्यक्त होत आहेत.

**संदर्भ ग्रंथसूची :**


१) शं. गो. तुळपुळे : 'यादवकालीन मराठी भाषा', व्हीनस प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती १९७३

२) सोटे दे. ग. : 'वैदर्भी बोलीचा शब्दकोश', सोटे साहित्य प्रकाशन संस्था वर्धा, प्रथमावृत्ती १९७४

३) वा. ना. देशपांडे : 'वऱ्हाडी लोकभाषा'

४) कालेलकर ना. गो. : 'भाषा आणि संस्कृती', मौज प्रकाशन, दुसरी आवृत्ती, डिसेंबर १९८२

५) धोंगडे रमेश – 'सामाजिक भाषाविज्ञान', दिलीपराज प्रकाशन, पहिली आवृत्ती, जानेवारी २००६

६) 'मराठीच्या प्रमुख बोली' - स ग मालशे भाषाविज्ञान.

७) 'वऱ्हाडी मराठी : उद्‌गम आणि विकास' - डॉ. शोभा नाफडे, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती ऑक्टोबर २००७.

८) 'भारतीय भाषांचे लोकसर्वेक्षण : महाराष्ट्र' संपादक - डॉ. गणेश देवी, प्रकाशक अरुण जाखडे, पद्मगंधा प्रकाशन, पुणे.

९) 'रायगड जिल्ह्यातील आगरी समाजाच्या लोकसाहित्याचा वाङ्मयीन व भाषिक अभ्यास' - डॉ. अनिल बांगर (अप्रकाशित प्रबंध) डिसेंबर. २०१०


◆◆◆

